महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

नवीन पोलीस प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

(१) ३८१३४ (१२-०४-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस स्टेशन, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस यांच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याच्या प्रस्तावास पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांच्याकडे प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस स्टेशनची इमारत फार जुनी झाली असून नवीन पोलीस प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०२२) : (१) होय

(२) व (३)

राज्यात ८७ पोलीस ठाणेच्या बांधकामासाठी तयार केलेल्या यादीस शासन मान्यता देण्यात आली असून त्यावर पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्या मार्फत करण्यात येत आहे. तसेच राज्यातील अनिवासी इमारतीच्या बांधकामांपैकी १८४ पोलीस ठाणे व ५३ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरविण्याची बाब विचाराधीन आहे. शासन मान्यतेनंतर निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्या मार्फत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या उच्चदाब प्रणाली योजनेअंतर्गत कामे अपूर्ण असल्याबाबत

(२) ४१५९६ (३०-०३-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या उच्चदाब प्रणाली योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या कृषीपंपासह घरगुती, औद्योगिक व वाणिज्य वीज पुरवठा इत्यादी कामे अपूर्ण असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत उच्चदाब प्रणालीची कामे अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे जिल्ह्यातील लाभार्थी शेतकऱ्यांना कृषीपंपाची प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने सदरहू काम लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
सोलापूर जिल्हयामध्ये दि. ३१.०३.२०१८ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ७६४९ कृषीपंप अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत वीज जोडणी देण्यासाठी ४९ अंशत: टर्नकीची निविदा देण्यात आले असून सद्य:स्थितीत ६९७१ कृषीपंपांना वीज जोडण्या दिलेल्या असून ६७८ कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
तसेच उस्मानाबाद जिल्हयातील दि. ३१.०३.२०१८ पूर्वी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपासाठी वीज जोडणी देण्याकरिता मे. व्होल्टास लि. मुंबई यांना पूर्णत: टर्नकीव्दारे कार्यादेश देण्यात आले होते. सदर योजनेत वीज जोडणीकरिता सद्य:स्थितीत प्रंलबित असलेल्या ५९९९ कृषीपंप ग्राहकांपैकी दि. १५.०२.२०२२ पर्यंत ४४६५ कृषीपंप ग्राहकांना वीज जोडण्या दिलेल्या असून २५९ कृषीपंप ग्राहकांची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच ३६५ कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्याची कामे प्रगतीपथावर असून उर्वरित ९१० कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देणे बाकी आहे.
(३) उस्मानाबाद जिल्हयातील कृषीपंप वीज जोडणी देण्याच्या कामामध्ये असमाधानकारक प्रगती असल्याने मे. व्होल्टास लि. यांना मुख्य अभियंता, परिमंडळ कार्यालय, लातूर यांच्याकडून कार्यादेश रद्द करुन काळया यादीत नाव समाविष्ट करण्याकरिता नोटिस-टू-टर्मिनेट देण्यात आली आहे. तसेच वेळोवेळी आढावा बैठक घेऊन कामाची गती वाढविण्याच्या सुचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पळसावडे (जि.सातारा) येथे वन कार्यालयातील कर्मचा-यांनी काळ्या फिती लावून निषेध केल्याबाबत

(३) ४१६९७ (०७-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पळसावडे (जि.सातारा) येथे गर्भवती महिला वनरक्षक कर्मचारी व तिच्या पतीला माजी सरपंच तसेच त्यांच्या पत्नीने माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मारहाण केल्याप्रकरणी पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथील वन कार्यालयातील कर्मचा-यांनी काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणत्या कलमांव्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) होय, खरे आहे.
(२) व (३) पळसावडे, जिल्हा सातारा येथे गर्भवती महिला वनरक्षक कर्मचारी व त्यांचे पती या दोघांना, माजी सरपंच व त्यांच्या पत्नीने माहे जानेवारी २०२२, दरम्यान मारहाण केल्याप्रकरणी त्यांच्या विरुध्द सातारा तालुका पोलीस ठाणे, येथे गु.र.नं.२८/२०२२ अन्वये भा.द.वि कलम ३५३, ३३२,५०४,५०६,३४,३५४,५०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) विलंब झालेला नाही.

हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथे पोलिस ठाण्यातील हद्दीत अवैध दारु व इतर विक्री सुरु असल्याबाबत

(४) ४१७१७ (०७-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथे पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुटखा, मटका, लूटमार, दारु अड्डे, अवैध दारु विक्री राजरोसपणे सुरु असून माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पोलिसांच्या विशेष पथकांबरोबरच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने कारवाई केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू या पथकांने किती जणांना अटक करण्यात आले व त्यांच्याकडून किती माल हस्तगत करण्यात आला आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी अटक करण्यात आलेल्यांवर कोणत्या कलमांन्वये कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) हातकणंगले पोलीस स्टेशन हद्दीमध्ये माहे जानेवारी २०२२ पोलीसांच्या विशेष पथकाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने अवैध धंद्यांविरुध्द कारवाई करुन दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) हातकणंगले येथे अवैधरित्या देशी-विदेशी दारुंचा साठा करणे व घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडरचा साठा केल्याप्रकरणी एका आरोपीस अटक केली होती व आरोपीकडून रु.१,०३,६३०/- इतक्या किमतीची देशी-विदेशी दारुचा साठा, विविध कंपनीचे रिकामे व भरलेले गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.
दुसऱ्या घटनेत हातकणंगले ते वडगाव रोडवरील कुंभोज फाटा येथील बंदीस्त खोलीत अवैध जुगार प्रकरणी एकूण ०४ आरोपींना अटक करण्यात आली होती व त्यांच्याकडून रु.९४,४७०/- इतक्या किमतीचे जुगार साहित्य जप्त करण्यात आले आहे.
(३) अवैधरित्या देशी-विदेशी दारुंचा साठा करणे व घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडरचा साठा केल्याप्रकरणी हातकणंगले पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.६०१/२०२१, महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), भा.दं.वि. कलम २८५ व जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
अवैध जुगार प्रकरणात हातकणंगले पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४१/२०२२, भा.दं.वि. कलम १८८, २६९, २७० व महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

कोल्हापूर येथे हनी ट्रॅपमध्ये पत्नीचा वापर करुन सराईत टोळीने एका मोठ्या व्यावसायिकाला लाखो रुपयांनी फसवणूक केल्याबाबत

(५) ४१७३२ (०७-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे हनी ट्रॅपमध्ये स्वतःच्या पत्नीचा वापर करुन सराईत टोळीने एका मोठ्या व्यावसायिकाला लाखो रुपयांनी फसवणूक केल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणात कागल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे काय तसेच आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आले असून त्यांचेवर कोणत्या कलमांन्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.
जयसिंगपूर, जिल्हा कोल्हापूर येथील एका व्यावसायिकाची लाखो रुपयांची फसवणूक झाली आहे. तथापि, सदर गुन्ह्यात आरोपींनी स्वत:च्या पत्नीचा वापर केल्याची बाब खरी नाही.
(२) सदर घटनेबाबत कागल पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४८३/२०२१, भा.दं.वि. कलम ३८६, १२०(ब), ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये दिनांक २६.११.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेत एकूण ०८ आरोपी असून आरोपी क्रमांक १ ते ७ वरील आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
आरोपी क्रमांक ८ यास दिनांक २१.३.२०२२ रोजी अटक करण्यात आली असून त्याच्या विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) विलंब झालेली नाही.

सोलापूर शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातल्यामुळे नागरिकांचा संताप झाल्याबाबत

(६) ४१८८६ (०७-०४-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत शांती अपार्टमेंटमध्ये घरफोडी करुन दागिने लंपास केले तसेच जुनी फौजदार चावडी परिसरात एका दवाखान्यात चोरट्यांनी महिलेची पर्स पळवली, हे खरे आहे काय,

(२) तसेच फौजदार चावडी पोलिस ठाणे हद्दीत भवानी पेठ येथून दुचाकी चोरीस गेली. बिरोबा मंदिर जवळून व मुरारजी पेठ अरविंद धाम रामलाल चौक जुळे, सोलापूर कोटणीस नगर रेल्वे लाईन मार्केट यार्ड विजापूर रोड परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातल्यामुळे नागरिकांत संताप व्यक्त होत असल्याचे वृत्त दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी व त्यासुमारास प्रसिद्ध झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात गुन्हेगारांवर गुन्हा नोंद झाला असून गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) विजापूर नाका परिसरातील शांती अपार्टमेंटमध्ये घरफोडी झाल्याची घटना घडलेली नाही.

जुनी फौजदार चावडी परिसरात एका महिलेची पर्स पळविल्या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गु.र.नं.०३/२०२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) मुरारजी पेठ सोलापूर येथून दुचाकी चोरीला गेल्या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गु.र.नं.०४/२०२२ व ४१/२२ असे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विजापूर नाका पोलीस ठाणे हद्दीतून बेन्नूर नगर, आदित्य नगर, मंत्रीचंडक नगर, कोटनीस नगर येथून दुचाकी चोरीला गेल्या प्रकरणी गु.र.नं.०९/२०२२, १०/२०२२, १४/२०२२, २१/२०२२ अन्वये ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) पर्स पळविल्याप्रकरणी आरोपीस अटक करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे व आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

दूचाकी चोरी प्रकरणी दोन गुन्ह्यामध्ये आरोपीस अटक करुन त्याच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

इतर गुन्ह्यांमध्ये पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

महागांव (जि.यवतमाळ) पोलिस स्टेशनचा पदभार पोलिस निरिक्षक यांनी स्वीकारल्यानंतर अवैध गैरकारभार सुरु झाल्याबाबत

(७) ४१९०७ (१२-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) पोलिस स्टेशनचा पदभार पोलिस निरिक्षक यांनी स्वीकारल्यानंतर शहरातील मटका, जुगार, गावठी व देशी दारु विक्री तसेच गल्लीबोळात मटक्यांचे अड्डे, जुगाराचे अड्डे, हॉटेल व धाब्यावर मिळणारी बनावट दारु असे अवैध गैरकारभार सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर तालुक्यातील गुंज गावात मटका, जुगार, अवैध दारु विक्री, गुटखा, गांजा व अवैधरित्या बियर विक्री यासह अनेक अवैध गैरकारभार सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची चौकशी केल्यास त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) नाही.

(३) महागांव पोलिस स्टेशनचा पदभार पोलिस निरिक्षक यांनी स्वीकारल्यापासून पोलीसांना वेळोवेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अवैध मटका,जुगार, गावठी व देशी दारु विक्री अश्या अवैध व्यवसायांवर वेळीच छापे टाकून महाराष्ट्र जुगार अधिनियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१. महागांव पोलीस स्टेशन हद्दीत

अ.क्र.	प्रकार	सन २०२१			सन २०२२ (दि.२०.०५.२०२२ पर्यंत)		
		दाखल गुन्हे	आरोपी संख्या	जप्त माल किंमत	दाखल गुन्हे	आरोपी संख्या	जप्त माल किंमत
१	अवैध जुगार	३१	८७	रू.५,०१,७८५/-	१२	१५	रू.२२,०२०/-
२	अवैध दारू	१९२	१९२	रू.१३,१३,६४८/-	७१	७१	रू.१,९०,२७१/-
३	अवैध गुटखा	५	१०	रू.४,१९,७०३/-	-	-	-

२. मौजा गुंज पोलीस स्टेशन महागांव हद्दीत

अ.क्र.	प्रकार	सन २०२१			सन २०२२ (दि.२०.०५.२०२२ पर्यंत)		
		दाखल गुन्हे	आरोपी संख्या	जप्त माल किंमत	दाखल गुन्हे	आरोपी संख्या	जप्त माल किंमत
१	अवैध जुगार	४	६	रू.३,५५०/-	३	३	रू.१,१००/-
२	अवैध दारू	८	८	रू.४,९६२/-	७	७	रू.१७,७६०/-

मुंगी (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील शेती मालकांनी जायकवाडी उजवा कालवा वितरिकाचे नुकसान केल्याबाबत

(८) ४१९१२ (१२-०४-२०२२). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंगी (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील गट नंबर ४१२ / ४१३ मधील शेती मालकांनी जायकवाडी उजवा कालवा वितरिका क्रमांक पाच बेकायदेशीर जेसीबीच्या सहाय्याने चारी व चारीचा रस्ता बुजवून शासकीय मालमत्तेचे नुकसान करुन, सदर रस्त्यावर अतिक्रमण करुन ऊस लागवड केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाच्या झालेल्या मालमत्तेचे नुकसानाची चौकशी करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय, जलसंपदा मंत्री महोदयांना दिनांक २८ मे, २०२१, दिनांक १७ जून, २०२१ व दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे चारी व चारीचा रस्ता बुजविल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी लागणारे पाणी बंद झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबधित प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना पाणी व रस्ता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
सदर वितरीका क्र.५ वरील संबंधित शेतकरी गोदावरी नदीवरील उपसाव्दारे पाणी घेत असल्याने वितरीकेवरील शिर्ष भाग सोडता उर्वरीत भागातील शेतक-यांकडून मागील २० वर्षापासून पाणी मागणी अर्ज प्राप्त होत नाहीत.
(४) सदर प्रकरणी चौकशी केलेली आहे व चारी लगतच्या शेतक-यांनी मोडली असून, संबंधित शेतक-यास नोटीस बजावण्यात आली आहे. अतिक्रमण काढुन चारी व रस्ता पुर्ववत करण्याचे काम प्रगती पथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नंदगाव-अणदूर (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथे मोठ्या प्रमाणात होत असलेल्या घरफोडी व चोरीच्या घटनांबाबत

(९) ४२०८१ (१२-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदगाव-अणदूर (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथे मंदिर, मठ व घरफोडी करुन चोरी झाल्याची घटना दिनांक २९ व ३१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेमध्ये चोरट्यांनी नंदगाव मधील बसवेश्वर मंदिरातील देवाचे दागिने, नथ व दान पेटीतील रोकड चोरली, मठात चोरी तसेच गावातील विविध भागात चार घरे फोडून दागिन्यांसह रोकड चोरुन नेली व अणदूर येथील घटनेत १५ तोळे सोने व ९० हजारांची रोकड चोरल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चाललेल्या चोरी व लुटालुटीच्या वाढत्या घटनेमुळे ग्रामस्थात घबराटीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी चोरट्यांना जेरबंद करावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी व सुरक्षतेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) अणदूर, ता.तुळजापूर येथे दिनांक ३१.०१.२०२२ रोजी घर फोडी झाल्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशन नळदुर्ग येथे प्राप्त झाली आहे.
याबाबत गु.र.नं.३७/२०२२, भा.दं.वि. कलम ४५७, ३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.
(२) नंदगाव, ता.तुळजापूर येथे मंदिर मठामध्ये चोरी झाल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही. मात्र अणदूर येथे झालेल्या घरफोडीमध्ये साडेसोळा तोळे सोने व रु.९०,०००/- इतकी रक्कम चोरीला गेली आहे.
(३) व (४) चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पेट्रोलिंगमध्ये वाढ करण्यात आली आहे.
तसेच कोंबिंग ऑपरेशन राबवून रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कारवाई करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ग्राम सुरक्षा यंत्रणा राबविण्यात येत असून या यंत्रणेद्वारे प्रत्येक गावातील व्यक्ती ग्राम सुरक्षा यंत्रणेचा मोबाईल ॲड करुन गावात चोर आल्यास तशी माहिती मोबाईलवर देऊन सर्वांना जागरुक करण्यात येते.
(५) विलंब झालेला नाही.

पारडी-अजनी-सोनेगाव (जि.नागपूर) येथे विविध भागात चोरी व घरफोडीच्या घटना घडल्याबाबत

(१०) ४२११७ (१२-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारडी-अजनी-सोनेगाव (जि.नागपूर) येथे विविध भागात चोर-भामट्यांनी हैदोस घातला असून एका दिवसात चोरी आणि घरफोडीच्या तब्बल पाच घटना घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने तपास केला आहे काय, तपासात काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करण्याबाबत व उक्त घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) व (२) पोलीस स्टेशन पारडी, अजनी, सोनेगाव जि. नागपूर येथे एका दिवसात चोरी व घरफोडीच्या पाच घटना घडल्याचे निदर्शनास आले नाही तथापि माहे जानेवारी ते जून, २०२२ मध्ये सदरच्या पोलीस स्टेशन अंर्तगत ४१ घरफोडी तर ९७ चोरीचे गुन्हे दाखल असून यापैकी अनुक्रमे ११ व २४ गुन्हे उघडकीस आले आहेत. उर्वरीत गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) सदर प्रकरणातील आरोपीना तातडीने अटक करण्याबाबत व उक्त घटनांना आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.
१.प्रत्येक बीट मध्ये अधिकारी, अंमलदार व बीट मार्शल देण्यात आले आहे.तसेच रात्रगस्त वाढविण्यात आल्या आहेत.
२.सर्व बीट अधिकारी मार्फत त्यांच्या बीट मधील घरफोडी चोरी होण्याचे हॉटस्पॉट ठरवुन पेट्रोलींग करण्यात येते.
३.कोंबीग ऑपरेशन राबवून अभिलेखावरील गुन्हेगारांना तपासण्यात येते तसेच घरफोडी व चोरी चे गुन्हे करणारा गुन्हेगार यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कार्यवाही केली जाते.
४.नाईट चेकींग दरम्यान नाकेबंदी मोहिम राबवून संशयीत वाहने व इसम यांना चेक करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी शहरात गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

(११) ४२२२३ (०७-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात गेल्या वर्षानुसार हत्यांचे गुन्हे, घरफोडीच्या घटना, चेन स्नॅचिंग, वाहन चोरीप्रकरण अशा घटनांमुळे भिवंडी शहरात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू घटनेला आळा घालण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) : (१) व २)

ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-२ भिवंडी मधील हत्येच्या गुन्ह्यांमध्ये घट झालेली असून घरफोडी, चैन स्नॅचिंग, वाहनचोरी या गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे.

सन २०२० व २०२१ मध्ये घरफोडी, चैन स्नॅचिंग, वाहनचोरी दाखल गुन्हयांची माहिती खालीप्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्गवारी	सन २०२०		सन २०२१		वाढ/ घट
		दाखल	उघड	दाखल	उघड	
१	खून	२४	२४	२३	२२	-०१
२	घरफोडी	१३३	६०	१५५	८२	+ २२
३	चैन स्नॅचिंग	१६	०४	२६	०९	+ १०
४	वाहनचोरी	४३४	१८२	४८७	१८३	+ ५३

(३) सदरहू घटनांना आळा घालण्याकरिता परिमंडळ २, भिवंडी अतंर्गत येणाऱ्या सर्व पोलीस स्टेशन हद्दीत नाकाबंदी व ॲन्टी चैन स्नॅचिंग नाकाबंदी लावण्यात येते. तसेच पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींगसाठी मोबाईल वाहन व बिटमार्शल

नेमलेले आहेत. पोलीस स्टेशन हद्दीत साध्या वेशातील पोलीस अधिकारी / अंमलदार यांची नियमितपणे दिवसा व रात्री, हद्दीत गस्त करण्याकरिता नेमणूक करण्यात येते.

पोलीस ठाण्याच्या हद्दीत ऑल आऊट व कोंबींग ऑपरेशन राबवून, गुंड, सराईत गुन्हेगार, फरार आरोपी, हिस्ट्रशिटर जेल रिलीज आरोपी यांना चेक करून योग्य ती कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बा---हाळी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील ३३ के.व्ही उपकेंद्रातंर्गत असलेल्या गांवात वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत.

(१२) ४२२९५(०९-०४-२०२२). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बा--हाळी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रातंर्गत असलेल्या सुमारे ४० गावातील विज पुरवठा १८ तास बंद असल्याचे दिनांक १३ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकामी झालेल्या रोहित्राच्या ठिकाणी नविन रोहित्राचा मोफत पुरवठा करण्यासाठी निधीची तरतूद असतांना देखील शेतक--यांकडून वाहतूक खर्च व ऑईलसाठी पैसे घेतल्याशिवाय रोहित्राचा पुरवठा केला जात नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, विज पुरवठा नियमित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे. दि. १३ नोव्हेंबर २०२१ रोजी २०.५० वाजता १३२ के. व्ही मुखेड उपकेंद्रातून ३३ केव्ही बाऱ्हाळी उपकेंद्राला येणारी उच्चदाब वाहिनी पाऊस व वादळी वारे तसेच वीज चमकणे या मुळे वीज पुरवठा नादुरुस्त झाल्याने बंद पडली. त्यामुळे ३३ के.व्ही. बान्हाळी उपकेंद्रातून वीज पुरवठा होणाऱ्या २५ गावांपैकी ०९ गावे पर्यायी मार्गाने दि. १३ नोव्हेंबर, २०२१ रोजी २३.२५ वाजता सिंगल फेज वीजपुरवठा देऊन चालु करण्यात आली. तसेच उर्वरित १६ गावांचा विद्युत पुरवठा दि. १४.११.२०२१ रोजी ११.३० वाजता चालू करण्यात आला. १३२ के. व्ही. मुखेड ते ३३ के.व्ही बान्हाळी उपकेंद्र यातील ३३ केव्ही लाईनचे अंतर हे २३ कि.मी असून सदरील लाईनचा दोष शोधून दुरुस्ती करण्यास पाऊस व वादळी वारे यामुळे उशीर झाला.

(२) देगलूर महावितरण विभागीय कार्यालयातंर्गत महावितरण कंपनीचे कोणतेही रोहित्र नादुरुस्त झाल्यास दुरुस्तीचे व बदलण्याची कामे महावितरण कंपनी द्वारे नेमून दिलेल्या इंम्पॅनलमेंट कंत्राटदाराद्वारे केले जातात. तसेच रोहित्र तेलाचा पुरवठा रोहित्र दुरुस्त करणाऱ्या कंपन्यांना महावितरण मार्फत वेळोवेळी आवश्यकतेनुसार करण्यात येतो. तसेच कृषी पंपाचे रोहित्र नादुरुस्त झाल्यास त्या रोहित्रावरील ८०% ग्राहकाकडून चालू देयके भरुन घेऊन जेष्ठता यादीनुसार त्वरित महावितरण द्वारे बदलण्यात येतो. या मध्ये ग्राहकाकडून वाहतुकीचे अथवा ऑईलचे पैसे घेतले जात नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत असलेली घरे १० वर्षाच्या आत विकण्याचा निर्णय नियमित करण्याबाबत

(१३) ४२३७० (१०-०४-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसनयोजनेअंतर्गत असलेली घरे १० वर्षाच्या आत विकण्याचा निर्णय नियमित करण्याकरिता विद्यमान शासनाने मंत्र्यांची समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्र्यांच्या समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, व सदर अहवाल मंत्रीमंडळाने स्वीकारून शासन आदेश निर्गमित केले आहेत काय,
(३) तसेच, २०११ च्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सशुल्क घरे देण्याच्या बाबतीत निर्णय घेण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वितरित केलेल्या सदनिका विकण्याचा कालावधी कमी करण्यासाठी तत्कालीन मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमितीचे गठण करण्यात आले आहे.
(२) व (३) सदर मंत्रीमंडळ उपसमितीने त्यांचा अहवाल शासनास सादर केला असून समितीने केलेल्या शिफारसी शासनाच्या विचाराधीन आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई, वरळी येथील “श्री सिक्स्टी वेस्ट” या प्रकल्पातील इमारतीतील पर्यावरण विषयक अटींची पूर्तता न केल्याने सदनिका विक्रीला हरित लवादाने केलेली मनाई

(१४) ४२३७५ (१०-०४-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, वरळी येथील “श्री सिक्स्टी वेस्ट” या प्रकल्पातील इमारतीतील पर्यावरण विषयक अटींची पूर्तता न केल्याने सदनिका विक्रीला हरितलवादाने मनाई केल्याचे माहे जानेवारी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हरित लवादाने नेमलेल्या संयुक्त समितीने, झोपडपट्टी पुनर्वसन सदनिकांमधील रहिवाशांसाठी वाहने उभी करण्याची सोय ही केली नसल्याचा
अहवाल सादर केंला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून कोणती कारवाई करण्यात केली आहे,
(४) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राष्ट्रीय हरित लवाद, पुणे खंडपीठ यांचे दि.०२.०२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.०३.२०२२ रोजी संयुक्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा) यांनी योजनेच्या पुनर्वसन घटकास पार्कींगची तरतूद अंतर्भूत करुन कृती योजना सादर करण्याच्या सूचना विकासकास दिलेल्या होत्या. त्यानुसार विकासकाने दि.२१.०३.२०२२ रोजी पुनर्वसन घटकासाठी ५०२ पार्कींगची तरतूद करुन कृती योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सादर केली आहे. पुनर्वसन घटकासाठी ५०२ पार्कींगची व्यवस्था करण्याच्या अटीच्या अधीन राहून प्रस्तावास पर्यावरण मंजुरी दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भुसावळ औद्योगिक वसाहतीतून जय इंडस्ट्रीमधून तीन लाखांची कॉपर केबल चोरट्यांनी चोरल्याबाबत

(१५) ४२३९५ (११-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ औद्योगिक वसाहतीमधील जय इंडस्ट्रीमधून तीन लाखांची कॉपर केबल चोरट्यांनी दिनांक ३० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास रात्री कुलूप तोडून चोरी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, अशा घटना वारंवार होवू नये म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) भुसावळ औद्योगिक वसाहतीमधील जय इंडस्ट्रीमधील रु.३ लाख इतक्या रकमेची कॉपर केबल दिनांक २८ ते ३०.०१.२०२२ दरम्यान चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सदर घटनेबाबत दिनांक ३०.०१.२०२२ रोजी बाजारपेठ पोलीस स्टेशन, भुसावळ येथे गु.र.नं. ५९/२०२२, भा.दं.वि.कलम ४५४, ४५७, ३८०, ४०१, ४१४, ४१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ०७ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

गुन्ह्यात चोरीला गेलेल्या मालापैकी रु.०१,३३,९८४/- इतक्या किंमतीची कॉपर केबल हस्तगत करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध करण्याकरीता औद्योगिक वसाहतीमधील कंपनी मालक यांची बैठक घेऊन त्यांना कंपनी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत व खाजगी सुरक्षा रक्षक नेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच पोलीसांकडून सदर भागात गस्त वाढविण्यात आली आहे.
(३) विलंब झालेला नाही.

राज्यात नांदेड, गोंदिया व यवतमाळ जिल्हयातील विविध ठिकाणी जलप्रवाहात आठ जण बेपत्ता असल्याबाबत

(१६) ४२४०८ (१२-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नांदेड, गोंदिया व यवतमाळ जिल्ह्यात विविध ठिकाणी जलप्रवाहात आठ जण बेपत्ता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी बेपत्ता झालेल्यांचा शोध घेतला आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात तपासात आजपावेतो किती जणांचा शोध लागला आहे, तसेच जलप्रवाहाच्या ठिकाणी सुरक्षायंत्रणा उभारण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) नांदेड जिल्हयात सन २०२१ मध्ये विविध पोलीस स्टेशन अंतर्गत १५ व्यक्ती जलप्रवाहात वाहून गेले होते. गोंदिया जिल्हयात कोणत्याही पोलीस स्टेशन अंतर्गत जलप्रवाहात बेपत्ता झाल्याबाबत नोंद नाही. यवतमाळ जिल्हयात सन २०२१ मध्ये पोलीस स्टेशन उमरखेड अंतर्गत दहागांव पुलाजवळ एस. टी. बस पाण्यात बुडाल्याने त्यातील प्रवासी व चालक व वाहक असे एकूण ४ व्यक्ती पाण्यात बुडून मरण पावले.
(२) होय
(३) नांदेड जिल्हयातील जलप्रवाहातून वाहून गेलेल्या १५ व्यक्तींचा व यवतमाळ जिल्हयातील घटनेतील बेपत्ता झालेल्या ४ व्यक्तींचा शोध लागलेला आहे.

यवतमाळ जिल्हयात घटना घडलेल्या ठिकाणी रूंदीकरणासह पुलाचे नव्याने बांधकाम संबंधित विभागाव्दारे करण्यात येत आहे तसेच नांदेड जिल्यात मुख्य जलप्रवाहाच्या ठिकाणी जीवरक्षक दलाची स्थापना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कृष्णुर (ता. नायगांव, जि. नांदेड) येथील दलित समाजातील व्यक्तीला विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याबाबत

(१७) ४२४२१ (०९-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृष्णूर (ता. नायगांव, जि. नांदेड) येथील दलित समाजातील कागडे कुटूंबातील व्यक्तीला विजेचा शॉक लागून मृत्यू

झाल्याने त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आल्याने कुटूंबास आर्थिक मदत देण्याबाबत त्यांच्या पत्नीने मागणी केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, कागडे कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) सदरील कागडे कुटूंबातील व्यक्तीला झालेला अपघात हा दुकानातील वेल्डींगचे काम करीत असताना वीजेचा शॉक लागून झालेला असल्याने व या घटनेस महावितरण जबाबदार नसल्याने महावितरणकडून कोणतीही आर्थिक मदत संबंधित कुटुंबाला देय नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

यावल, (जि.जळगांव) तालुक्यातील येथील शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पावरील प्रस्तावित उपसासिंचन योजनाबाबत

(१८) ४२५१३ (०१-०४-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगांव) तालुक्यातील केंद्र शासनाच्या बळीराज जलसंजीवनी योजनेंतर्गत येणाऱ्या शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पावर सिंचनासाठी राज्य शासनाने उपसासिंचन योजना प्रस्तावित करण्याबाबत दिनांक २५.१०.२०१० रोजी वा त्यासुमारास केंद्रीय जल आयोगाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महालेखापाल, नागपूर यांचे दिनांक ०४.०७.२००९ चे अहवालानुसार उपसासिंचन योजना शासकीय खर्चाने कार्यान्वित करुन लाभार्थांना सिंचनाचा लाभ देण्यात यावा असा मुद्दा उपस्थित केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त मध्यम प्रकल्पावरील प्रस्तावित उपसासिंचन योजना कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे. केंद्र शासनाच्या दि. २५.०६.२०१० रोजीच्या TAC च्या बैठकीमध्ये शेळगाव बॅरेजचे काम २०१४ पुर्वी पुर्ण करण्याच्या अटीच्या अधीन राहुन प्रकल्पास उपसा सिंचन योजनेच्या बाबीसह मंजुरी देण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे. अडविलेल्या पाण्याचा वापर होणेसाठी उपसा सिंचन योजना प्रकल्पाचा भाग असावा जेणेकरुन केलेला खर्च वाया जाणार नाही. असे अभिप्राय सदर लेखा अहवालात नमुद आहेत.
(३) प्रस्तावित यावल उपसा सिंचन योजनेस तत्वत: मान्यता देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चोपडा (जि.जळगांव) मतदार संघातील जलसंपदा विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध प्रकल्प व योजनेच्या प्रलंबित कामांबाबत

(१९) ४२५१५ (०१-०४-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगांव) मतदार संघातील जलसंपदा विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या निम्न तापी प्रकल्प, पाडसळे प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करणे, लघु पाटबंधारे योजना हरिपुरा, लघु पाटबंधारे योजना निंबादेवी (ता.यावल) पूर्ण करण्याकरीता निधीची तरतूद करणे, गुळ मध्यम सिंचन प्रकल्पातील बाधीत शेतकऱ्यांना भूसंपादनासाठी

तसेच बंदिस्त पाईप लाईनसाठी निधीची तरतूद करणे, गुळ मध्यम सिंचन प्रकल्पाची उंची वाढविणे, हतनूर सिंचन प्रकल्पावरील उजवा कालवा मधील दुरुस्तीच्या कामांची अंदाजपत्रके मंजूर करणे इत्यादी कामे करण्याबाबत दिनांक ०४.०१.२०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीसह संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक मंत्रालय, मुंबई येथे घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्अनुषंगाने सदर प्रकल्प व योजनेच्या प्रलंबित कामांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय. हे खरे आहे.

(२) मंत्रिमंडळ निरसित झाल्याने प्रारूप इतिवृत्त निर्गमित करण्यात आले नाही तथापि प्रश्नात नमूद केलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे -

१) निम्न तापी प्रकल्प :-

निम्न तापी पाडळसे प्रकल्पाचा समावेश केंद्र शासन पुरस्कृत PMKSY-AIBP (२०२१-२६) या योजनेत समावेश करण्यासाठी प्रस्ताव दि. ०७.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

तसेच निम्न तापी प्रकल्पाचा केंद्रशासनाच्या अर्थ सहाय्यित PMKSY योजनेत समावेश होणेकरिता Investment Clearance चा प्रस्ताव महामंडळाचे पत्र क्र. ता पा वि म/ १८२६ दि. १९/०४/२०२२ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे. त्याअन्वये शासनाचे (ज सं वि) पत्र क्र. निम्न ता- ०८१९ / प्र क्र. ४००/१९/मो प्र १ दि. ०५/०७/२०२२ अन्वये सदर प्रकल्पास सर्व प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे उचित राहिल असे कळविले आहे. त्यानुसार निम्न तापी प्रकल्पाचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव तांत्रिक छाननी करिता राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे सादर करण्याबाबत तपासणीच्या कार्यवाहीत आहे व माहे ऑगष्ट २०२२ अंती राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे सादर करण्यात येईल. प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाले नंतर सदर प्रकल्प PMKSY मध्ये समावेश करणेबाबतची पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

निम्न तापी प्रकल्पाकरिता एकुण २३९७ हे. इतके भुसंपादन क्षेत्राची आवश्यकता आहे व यापैकी ७७०.४८ हे एवढे क्षेत्राचे भुसंपादन झाले असुन १६२९.१२ हे इतक्या क्षेत्राची भुसंपादन प्रक्रीया चालु आहे. भुसंपादनाकरिता अद्यापवोत रु. १८९.४० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे .

२) लघु पाटबंधारे योजना हरीपुरा :-

सदर प्रकल्पाचे प्रकल्पीय पाणीसाठा ५.९९८ द.ल.घ.मी. पैकी ४.४८९ द.ल.घ.मी. पाणीसाठा सन-२०१० मध्ये पुर्ण झालेला आहे, धरणाचे मातीकामे पुर्ण झाले असून सांडव्याचे काम पुर्ण होऊन पुर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण झाला आहे, तसेच पुच्छ कालव्यातील धूप प्रतिबंधक कामे प्रगतीपथावर आहे. प्रकल्पीय सिंचन क्षेत्र ५६४ हेक्टर आहे व बंदिस्त वितरण प्रणालीद्वारे करण्याचे नियोजित आहे. त्याचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचे मार्फत प्राप्त असुन तांत्रिक मान्यतेच्या कार्यवाही आहे. त्यानुसार सदर प्रकल्प माहे डिसेंबर २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन असुन प्रकल्पासाठी अवशिष्ठ कामांतर्गत सन २०२२-२३ साठी रु.५.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

३) लघु पाटबंधारे योजना निंबादेवी :-

सदर प्रकल्पाचे प्रकल्पीय पाणीसाठा २.४२८ द.ल.घ.मी. असुन पाणीसाठा १००% निर्मित झाला आहे. सदर प्रकल्पाचा मुख्य कालवा हा ०.६६ कि मी लांबीचा मुक्त प्रवाही असुन यावरील २ प्रपातांची संकल्पन मान्यतेच्या कार्यवाहीत आहे. १.३७५ कि.मी. ची मुख्य बंदिस्त पाईप लाईन आहे. या प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र ३०६ हे. असुन या क्षेत्राचे बंदिस्त वितरण प्रणालीची कामे पुर्ण झाली आहेत. सदर प्रकल्प माहे डिसेंबर २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन असुन सदर प्रकल्पासाठी अवशिष्ठ कामांतर्गत सन २०२२-२३ साठी रु.२.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

४) गुळ मध्यम प्रकल्प :-

i) भुसंपादन:-

गुळ मध्यम प्रकल्पाकरिता एकुण ३००.०२ हे इतक्या भुसंपादन क्षेत्राची आवश्यकता असुन भुसंपादन कायदा सन १८९४

अन्वये एकुण २०९.०८ हे इतक्या क्षेत्राचे भुसंपादन झालेले आहे व उर्वरीत ९०.९४ हे इतक्या क्षेत्राचे खाजगी वाटाघाटीने खरेदीची कार्यवाही प्रगतीत आहे. सदरचा प्रस्ताव भुसंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अंमळनेर भाग यांच्याकडे थेट खरेदीसाठी पडताळणी करीता सादर करण्यात आलेली आहेत. तसेच खरेदी प्रक्रीया पुर्ण करण्या करीता रक्कम रू. १० कोटीनिधी वितरित करण्यात आला आहे व याद्वारे ९०.९४ हे. पैकी २३.५९ हे. क्षेत्र खरेदी झाले आहे. उर्वरीत ६७.२८ हे. भूसंपादन बाकी आहे. असून रू. २४.४३ कोटी आवश्यक आहे व याकरिता निधी उपलब्धतेनुसार निधी वितरित करण्यात येणार आहे.

ii) बंदिस्त वितरण प्रणाली:-

गुळ मध्यम प्रकल्पाचे शेताचा-यांचे काम बंदिस्त वितरण प्रणालीने करणेबाबत मंडळाचे पत्र जा.क्र./जपाप्रमं/तां-२/४००१/सन२०२१ दिनांक- २८/०९/२०२१ अन्वये अधीक्षक अभियंता (कालवे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना संकल्पन करून मिळणेबाबत कळविले होते. परंतु मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी त्यांचे पत्र जा.क्र./ मसंसं/अ.अ.(का)/कासंवि४/३९/२०२२,दि.१२/०१/२०२२ अन्वये शासन निर्णयास अनुसरून नलिका वितरण प्रणालीचे संकल्पन करणे व त्यास मंजुरी देण्याचे अधिकार क्षेत्रीय स्तरावर असल्याने या प्रकारची कामे क्षेत्रीय स्तरावर करण्यात यावीत, असे अवगत केलेले आहे. तरी संबंधित विभागाचे पत्र क्र. १९९६ दि. ०८/०८/२०२२ अन्वये गुळ मध्यम प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्यावरील बंदिस्त वितरण नलिका व्यवस्थेच्या संकल्पनांची कामे इ. करिता ची प्रापणसुची मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. ३३८९ दि. १२/०८/२०२२ अन्वये महामंडळात तपासणीच्या कार्यवाहीत आहे.

iii) उंचीवाढ:-

शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळणेसाठी गुळ मध्यम सिंचन प्रकल्पाची उंची वाढविणे. - गुळ मध्यम प्रकल्पाचे धरणस्थळ मुख्य स्त्रोतापासून केवळ १३ किमी अंतरावर आहे. गुळ प्रकल्पाचा चतुर्थ सुप्रमा प्रमाणे प्रकल्पस्थळी ५०% अवलंबतेनुसार २५.०६५ द ल घ मी येवा अपेक्षित आहे. गुळ प्रकल्पाचा पाणी वापर चतुर्थ सुप्रमा प्रमाणे २४.३९ द ल घ मी नियोजित आहे. तरी अपेक्षित येवा आणि नियोजित वापराची तुलना केली असता केवळ ०.६७५ द ल घ मी येवा जास्त दिसत आहे. केवळ ०.६७५ द ल घ मी पाणीसाठ्यासाठी प्रकल्पाची उंचीवाढ परवडण्याजोगे /व्यवहार्य नसल्याचे दिसुन येत आहे.

iv) निधी बाबत:- सदर प्रकल्पाचा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव नव्याने करण्याचे कार्यवाहीत आहे.

५) हतनुर प्रकल्प:-

हतनूर उजवा कालवा कि.मी. ५० ते ९२ मधील दुरूस्तीचे चार अंदाजपत्रके ही या कार्यालयाचे पत्र क्र. २६९७ दिनांक ०५/०७/२०२२ नुसार जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई येथे प्रशासकीय मान्यतेच्या आवश्यक कार्यवाहीस्तव सादर करण्यात आलेली आहे सदर प्रशासकीय मान्यतेनंतर सदरची कामे करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

कंधार (ता, जि. नांदेड) येथील कंधार शहरातील बारुळ व कुरुळा येथे महावितरणने वीज बिल भरणा करण्याची सुविधा नसल्याबाबत

(२०) ४२५१८ (०९-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (ता, जि. नांदेड) येथील बारुळ व कुरुळा येथे महावितरणने वीज बिल भरणा करण्याची सुविधा नसल्याने ग्राहकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज बिल भरणा करण्याकरीता सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१)हे अंशत: खरे आहे, बारुळ व कुरुळा येथील ग्राहकांना विज बिल भरणा करिता कुरुळा शाखेतील एकूण ९ महावितरण जनमित्रपैकी ५ जनमित्र व बारुळ शाखेतील एकुण ८ महावितरण

जनमित्रपैकी २ जनमित्रांना ग्राहकांचे विज बिल भरणा घेण्यासाठी मोबाईल ॲप द्ववारे वॉलेट सुविधा असुन त्याद्वारे जनमित्र ग्राहकाकडुन विज बिल भरणा करुन घेतात.
(२) बारुळ शाखेतील खाजगी विज बिल भरणा (महापावरपे) एक प्रस्ताव व कुरुळा शाखेतील दोन प्रस्ताव असे एकुण तीन प्रस्ताव महावितरणच्या विचाराधीन आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी कबनूर (ता.हातकणंगले) येथे पित्याने पाच वर्षाच्या मुलाला पंचगंगा नदीत फेकल्याबाबत

(२१) ४२५२० (११-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी कबनूर (ता.हातकणंगले) येथे औषधोपचाराचा खर्च परवडत नसल्याच्या कारणांवरुन निर्दयी पित्याने आपल्या पाच वर्षाच्या मुलाला पंचगंगा नदीत फेकल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) व (२) होय हे खरे आहे.
आरोपीने मुलाचा औषधोपचाराचा खर्च परवडत नसल्याने मुलास दिनांक ३०.९.२०२१ रोजी पंचगंगा नदीत फेकून देऊन जिवे ठार मारले असलेबाबत देण्यात आलेल्या फिर्यादीवरुन शिवाजी नगर पोलीस स्टेशन, इचलकरंजी येथे गु.र.नं.५१३/२०२१, भा.दं.वि.कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदर प्रकरणात आरोपीस अटक करुन गुन्ह्याच्या तपासाअंती मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) विलंब झालेला नाही.

धुळे येथे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय सुरु करण्याबाबत

(२२) ४२५२८ (०९-०४-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी सात नवीन समित्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालये कोणकोणत्या भागात सुरु करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, धुळे येथे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय सुरु करण्याबाबत दि.१३/०९/२०२१ च्या शासन निर्णयानुसार मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कार्यालयाकरिता किती पदे मंजूर करण्यात आलेली आहेत व निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. विजयकुमार गावीत (१४-११-२०२२) :(१), (२) व (३) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.एसटीसी.२०१९/प्र.क्र.३४/का.१०, दिनांक १३.०९.२०१९ अन्वये पालघर, नाशिक-२, धुळे, किनवट जि. नांदेड, यवतमाळ, गोंदीया व चंद्रपूर येथे नवीन सात अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची स्थापना करण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली आहे.

(४) सदर समिती कार्यालयांकरीता नियमित १० पदे व मानधन तत्वावरील १० पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच सद्यस्थितीत सदरील सर्व सात समिती कार्यालये कार्यान्वित करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

द्वारे बनवलेले दस्ताऐवजांबाबत

(२३) ४२५३८ (११-०४-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तलासरी (जि.पालघर) तहसीलदारांच्या बनावट शिक्का बनवून, बनावट दाखल्याच्या आधारे दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर फसवणूकीच्या गुन्ह्यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) : (१) व (२)

बी.नानाजी इंटरप्राईजेस लिमिटेड यांनी तहसीलदार, तलासरी यांच्या बनावट सही व नावाचा बनावट शिक्का वापरुन व बनावट स्वाक्षरी करुन भोगवटा दाखला तयार करुन तो बनावट दाखला खरा आहे, असे भासवून दुय्यम निबंधक कार्यालय, तलासरी यांचेकडे बी.नानाजी इंटरप्राईजेस लिमिटेड यांच्या फायदयाकरिता दस्त नोंदवून शासनाची फसवणूक केली आहे.

सदर प्रकरणी घोलवड पोलीस ठाणे, पालघर येथे गु.र.क्र. १२/२०२२ भा.दं.वि.सं. १८६० मधील कलम ४२०, ४६७, ४६८, ४६९, ४७१ अन्वये दि.०२/०२/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात झालेल्या तपासात बी. नानाजी इंटरप्राईजेस लिमिटेड यांनी प्राप्त केलेला भोगवटा दाखला तसेच नैसर्गिक व वादगस्त नमुना हस्ताक्षर गुन्हयाच्या तपासकामी परिक्षणाकरिता गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत. हस्ताक्षर परिक्षण अहवाल येणे बाकी आहे.

या गुन्ह्यामध्ये चार आरोपींचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून पुढील तपास सुरु आहे .
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यात अवैध बायोडिझेलची विक्री होत असल्याबाबत

(२४) ४२६७८ (११-०४-२०२२). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मारतळा (ता.लोहा, जि.नांदेड) व मुजामपेठ, बोंढारा, वाजेगांव (ता.जि.नांदेड) या ठिकाणी अवैधरित्या बायोडिझेल विक्री करण्याचे केंद्र मोठ्या प्रमाणात चालविले जात असल्याचे नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याची हद्द तर बायोडिझेल विक्रीचे केंद्रस्थान बनल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील महसूल व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने मारतळा येथे छापा टाकून सहाशे (६००) लिटर बायोडिझेल, दोन ट्रक, मोजमाप यंत्र इलेक्ट्रीक मशिन असा ३४ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अवैध बायोडिझेलच्या विक्रीमुळे शासनाचा कोट्यवधी महसूल बुडाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच अवैध बायोडिझेल विक्री व त्यांना मदत करणाऱ्या स्थानिक महसूल पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ या कालावधीत पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण अंतर्गत अवैध बायोडिझेल संबंधाने पोलीस प्रशासन व महसूल विभागांच्या पथकाकडून संयुक्तपणे कारवाई करुन नांदेड पोलीस स्टेशनमध्ये ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) मार्ताळा ते हतनी फाटा दरम्यान पोलीस प्रशासन व महसूल विभागांच्या पथकाकडून संयुक्तपणे कारवाई करुन एक टेम्पो, एक ट्रक व ६०० लिटर्स बायोडिझेल व इतर साहित्य असा एकूण रु.३४,९६,७५०/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(३) याबाबत अवैध बायोडिझेलची विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करुन शासनाचा महसूल बुडण्यापासून प्रतिबंध करण्यात आला आहे.
(४) मार्ताळा ते हतनी फाटा येथील अवैध बायोडिझेल प्रकरणी पोलीस स्टेशन उस्माननगर, जि.नांदेड येथे गु.र.नं.२४७/२०२१, भा.दं.वि. कलम ३४, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील कलम ३/७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) विलंब झालेला नाही.

महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, उपविभाग कुरखेडा, (जि. गडचिरोली) कार्यक्षेत्रात विदयुत रोहीत्र कुलुपबंद पेटीत नसल्याबाबत

(२५) ४२७१३ (०९-०४-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, उपविभाग कुरखेडा, (जि. गडचिरोली) येथील कार्यक्षेत्रात विदयुत रोहीत्र कुलुपबंद पेटीत बसविण्यात न आल्याने कचरा अथवा झुडपाच्या विळख्यात असल्याने आग लागुन धोका निर्माण झाल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रोहीत्रांना कुलुपबंद पेटया बसविण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) उपविभाग कुरखेडाअंतर्गत एकूण ९५६ रोहित्र असून पूर्व विदर्भ योजनेअंतर्गत ८० रोहित्रांच्या वितरण पेट्या बसविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. उर्वरीत रोहित्रांचे सर्वेक्षण करून जेथे कुलुपबंद वितरण पेट्या नाहीत ते चिन्हांकित करून तेथे नवीन कुलुपबंद वितरण पेट्या बसविण्याचे काम कृषीपंप विज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या उपलब्धतेनुसार अथवा देखभाल व दुरूस्ती योजनेअंतर्गत सदर कामे प्राधान्यक्रमानुसार करण्यात येतात.

तुळजापूर रोडवरील भोगाव परिसरातील ट्रिपल ट्रेडिंग कारखान्यावर पोलिस आयुक्तांच्या विशेष पथकाने १० बॅरेल तूप व तेलजन्य पदार्थ जप्त केल्याबाबत

(२६) ४२७४० (११-०४-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर रोडवरील भोगाव परिसरातील सोलापूर महानगरपालिकेच्या कचरा डेपोजवळ मेलेल्या जनावरांची हाडे आणि आतड्यांपासून तूप व तेलजन्य पदार्थ बनविणा-या ट्रिपल ट्रेडिंग कारखान्यावर पोलिस आयुक्तांच्या विशेष पथकाने धाड टाकून १० बॅरेल तूप व तेलजन्य पदार्थ जप्त केल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात तुपाची विक्री कोणकोणत्या जिल्ह्यात व शहरात झाल्याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) सदर प्रकरणी दिनांक १७.१२.२०२१ रोजी पोलीसांमार्फत कारवाई करण्यात येऊन ५३ प्लॅस्टिक ड्रम, ८२ पत्र्याचे डबे व १३ लोखंडी ड्रम, मांस, हाडे व चरबीपासून तयार करण्यात आलेले तेल जप्त करण्यात आले आहे.
(२) सदर कारखान्यात जनावरांच्या चरबी व आतड्यांपासून टॅलो ऑईल तयार केले जात होते व त्यापासून कॅल्शियम ग्रीस तयार करण्यासाठी त्याची विक्री विजयवाडा, आंध्र प्रदेश येथे केली जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.
(३) सदर प्रकरणी दिनांक १७.१२.२०२१ रोजी पोलीसांकडून कारवाई करुन गु.र.नं. ६४८/२०२१, भा.दं.वि. कलम २६८, २६९, २७८, १८८, ३४, भारतीय प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंध अधिनियम, १९७४ चे कलम २१ व २६, भारतीय विज अधिनियम चे कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदर गुन्ह्यामध्ये ०२ आरोपींना अटक करण्यात आली असून मा.न्यायालयात दिनांक १६.५.२०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

नायगांव, दादर (मुंबई) विभागातील भू.क्र.४३२ वरील एसआरए प्रकल्पात मे.ओमकार रिअल्टर्स ॲड डेव्हलपर्स प्रा.लि यांनी सदनिकाधारकांची केलेली फसवणूक

(२७) ४२८२७ (१८-०४-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगांव, दादर (मुंबई) विभागातील भू.क्र.४३२ (पै) व इतर मिळकतीवरील एस.आर.ए प्रकल्प अंतर्गत स्वराज्य सहकारी गृह संस्थेमध्ये श्री.गणेश यशवंत सरवदे यांचा परिशिष्ट-दोन मध्ये अ.क्र.१३८५/१३८६ अन्वये पात्र सदस्य म्हणून उल्लेख असतांनाही विकासकाने संगनमत करुन त्यांची सदनिका दुस-या अन्य व्यक्तीस वितरित करुन फसवणूक केल्याबाबत श्री.गणेश सरवदे यांनी शासनास तसेच एस.आर.ए कडे दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी तक्रारी केल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या फसवणूक प्रकरणी श्री.गणेश यशवंत सरवदे यांनी तक्रार केल्यानंतर सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर झोपुप्रा (एसआरए) मुंबई यांनी याबाबत खुलासा सादर करण्याबाबत मे.ओमकार रिअल्टर्स ॲड डेव्हलपर्स प्रा.लि यांना दिनांक १ डिसेंबर,२०२० रोजी व तदनंतर दिनांक ४ जानेवारी,२०२१ रोजी निर्देश दिल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुंषागाने मे.ओमकार रिअल्टर्स ॲड डेव्हलपर्स प्रा.लि यांनी त्यांचेकडे कोणत्याही इमारतीच वाटपासंदर्भात सोडत शिल्लक नसताना श्री.गणेश यशवंत सरवदे यांना पुढील सदनिका वाटपाच्या वेळी सदनिका वाटप करण्यात येईल असा खुलासाही सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या श्री.गणेश सरवदे यांना सदनिका वाटपात झालेला गैरव्यवहार व फसवणूक प्रकरणाबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) होय, तक्रारी केलेली आहे.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
अभियांत्रिकी विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी सदर योजनेमध्ये इमारत क्र.३ व ४ चे काम चालू

आहे असे दि.१६.०४.२०२१ रोजी कळविलेले आहे. त्यामुळे सदर योजनेमध्ये सोडत शिल्लक असून विकासकाने दिलेला खुलासा योग्य आहे.
(४) सदनिका वाटपाचा प्रस्ताव त्वरित सादर करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत विकासकास सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

केज विधासभा मतदार संघात विद्युत व नवीन विकास कामासाठीच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत

(२८) ४२९८० (०९-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) विधासभा मतदार संघ हा अनुसूचित जाती साठी राखीव मतदार संघ असून महावितरण तर्फे केज मतदारसंघातील विदयुत व नवीन विकास कामासाठी अनुसूचित राखीव मतदारसंघासाठी खास बाब म्हणून जवळपास १५० ते २०० कोटीचा प्रस्ताव आधीक्षक अभियंता, महावितरण, बीड यांनी मुख्यभियंता, महावितरण, लातूर यांच्या मार्फत मंजुरी साठी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदयुत संबंधी व नवीन विकास कामे करण्यासाठी सदर प्रस्तावास त्वरित मंजुरी देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन केज मतदार संघातील विदयुत संबंधी व नवीन विकास कामे करण्यासाठी सदरहू प्रस्तावास त्वरित मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
केज मतदार संघ हा अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ असून या मतदार संघाकरीता रु. १६७.०० कोटीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) श्रीमती नमिता मुंदडा, विधानसभा सदस्य यांचे मागणीनुसार केज मतदार संघातील नविन उपकेंद्रे, उपकेंद्रामध्ये अतिरिक्त ऊर्जा रोहित्र बसविणे व इतर मागण्या बाबतचा अंदाजे १६७ कोटी रु. चा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. केज मतदार संघातील कामांची तांत्रिक सुसाध्यता व आर्थिक व्यवहार्यता तपासून निधीच्या उपलब्धतेनुसार व प्राधान्य क्रमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत, अनुसूचित जाती राखीव विधानसभा मतदार संघातील विदयुतीकरणाकरीता व पायाभूत सुविधा उभारणीकरीता रु. १७२८.३९ कोटीची मागणी करण्यात आली असून त्यामध्ये केज मतदार संघातील कामांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंजनपूर (ता.अंबाजोगाई, जि. बीड) व कानडीबोरगाव (जि. लातूर) या ठिकाणी मांजरा नदीच्यावरील बॅरेजच्या विविध समस्या बाबत.

(२९) ४३०४३ (१२-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनपूर (ता.अंबाजोगाई, जि. बीड) व कानडीबोरगाव (जि. लातूर) येथील मांजरा नदीवर बांधण्यात आलेल्या बॅरेजवरील विविध १२ समस्या तातडीने सोडविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांना दिनांक २६/०९/२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्अनुषंगाने सदरहू बॅरेजच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) बॅरेजवरील क्षतीग्रस्त द्वारांकरिता उपाययोजना सुचविण्याबाबत मध्यवर्ती संकल्पन चित्र संघटना, नाशिक मार्फत कार्यवाही सुरू आहे.
सदर उपाययोजना प्राप्त झाल्यानंतर तात्काळ उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे वाघेबाबुळगाव, (ता. केज, जि. बीड) येथील धरणाच्या विशेष दुरुस्ती कामास व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

(३०) ४३०५८ (११-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वाघेबाबुळगाव, (ता. केज, जि. बीड) येथील धरणाच्या विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळास सादर करण्यात आले असून महामंडळ स्तरावर प्रस्तावाची प्राथमिक तपासणी केली असता सदर प्रस्तावात त्रुटी आढळून आल्या होत्या त्यानुसार त्रुटींची पूर्तता करून सुधारणा अहवाल महामंडळास सादर करण्यात आला असून त्यानुसार प्रस्तावाची किमंत रु.२०३.६७ लक्ष एवढी आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुर्ण झालेल्या व सिंचन व्यवस्थापने अंतर्गत हस्तांतरित झालेल्या मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांचे विशेष दुरुस्ती/विस्तार सुधारणा/पूर संरक्षक कामे दुरुस्ती, नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) यांच्या प्रशासकीय मान्यतेचे व सुधारित प्रशासकीय मान्यतेचे रू. ५ कोटी पेक्षा कमी किंमतीच्या अंदाजपत्रकांचे प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय करीत असलेल्या छाननी प्रमाणे महामंडळ स्तरावर छाननी करून अहवाल कार्यकारी संचालक यांचे शिफारशीने थेट शासनास सादर करावयाच्या सुचना असल्याने सदर प्रस्ताव सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई. यांना सदर केला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पुच्छ कालव्यावरील मार्गदर्शक बांध खचून धरणाच्या टो-ड्रेन ला धोका होऊ शकतो यामुळे मार्गदर्शक बांधाला टो-वॉल करणे आवश्यक असल्याने सदर काम धरण सुरक्षीततेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मौजे वाघेबाबुळगाव, (ता. केज, जि. बीड) येथील धरणाच्या विशेष दुरुस्तीच्या कामाच्या रु.२०३.६७ लक्ष किमंतीच्या अंदाजपत्रकास त्वरित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांच्याकडे दि. २६/०९/२०२१ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून धरणाच्या विशेष दुरुस्तीच्या कामाला मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
शासनास सादर मौजे वाघेबाभुळगाव (ता.केज,जि.बीड) येथील धरणाच्या विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रकाबाबत दि.१०.११.२०२१ च्या पत्रान्वये शासन स्तरावरुन उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करुन विशेष दुरुस्ती अंतर्गत अंदाजपत्रकाची रक्कम रु.२२१.८० लक्ष होत आहे.
(२) होय ,हे खरे आहे.
(३) होय,हे खरे आहे.
(४) होय,हे खरे आहे.
(५) वाघेबाभुळगाव मध्यम प्रकल्प ता.केज,जि.बीड या प्रकल्पाच्या पुच्छ कालव्याशी संबंधित विशेष दुरुस्ती प्रस्तावास जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.२२.०७.२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

राज्य विज नियामक मंडळाने उद्योगासाठी वीज दरात एक रुपया कमी करण्याच्या दिलेल्या आदेशाबाबत

(३१) ४३०७५ (०९-०४-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य विज नियामक मंडळाने उद्योगासाठी वीज दरात एक रुपया कमी करण्याचे आदेश देऊन वर्ष झाले असले तरी त्यावर अद्यापपर्यंत अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी,२०२२ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

मा. आयोगाने दि.३०.०३.२०२० रोजी सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ पर्यंतच्या कालावधीसाठी बहुवर्षीय वीजदर आदेश जारी केले आहेत. त्यानुसार महावितरणच्या विविध ग्राहक वर्गवारीकरीता वीज पुरवठा करण्यासाठी

दि. ०१.०४.२०२० पासून सुधारीत वीजदर लागू करण्यात आले आहेत. वीज ग्राहकांचे वीजदर मा. आयोगातर्फे ठरविण्यात आले व त्याप्रमाणे वीज दरांची आकारणी महावितरणतर्फे करण्यात येत आहे. तथापि, यामध्ये कुठलाही बदल करण्याचे अधिकार महावितरणला नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मे. आकाश इलेक्ट्रिकल वर्क्स, बीड यांनी लातूर विभागांतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, लाईन, कॅपेसिटर, व जुन्या उपकेंद्राची क्षमता वाढ इत्यादी कामाचे देयक महावितरण कंपनी दिले नसल्याबाबत

(३२) ४३१०२ (०९-०४-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे. आकाश इलेक्ट्रिकल वर्क्स, बीड यांनी लातूर विभागांतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, लाईन, कॅपेसिटर, व जुन्या उपकेंद्राची क्षमता वाढ इत्यादी कामे वेळेत पूर्ण करूनही त्यांना सदर कामाचे देयक महावितरण कंपनी च्या लातूर विभाग यांनी दिले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम हे कार्यान्वित करण्यासाठी काही वाढीव नगाची आवश्यकता होती त्यानुसार मुख्य अभियंता, लातूर यांनी तपासणी करून सदर कंपनीला कळविले व त्यानुसार कंपनीने वाढीव सामुग्रीचा पुरवठा करुन काम वेळेत पूर्ण केले व संबधित अधिका-यांनी या कामाच्या मोजमाप पुस्तकात नोंदी देखील केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीने वाढीव केलेल्या कामाची रक्कम ४.१० कोटी होत असताना त्यांना फक्त २५ लक्ष अदा करण्यात आले आहेत व उर्वरित ३.८५ कोटी येणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महावितरण कंपनी मुख्यालय यांच्या सुचनेनुसार मुख्य अभियंता लातूर यांनी वाढीव केलेल्या कामाची कमिटी द्वारे तपासणी करुन तसा अहवाल त्यांना दि. २ जून. २०२० रोजी सादर केला असताना देखील अद्याप कंपनीला या कामाचा मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास , सदर प्रलंबित देयक व त्यावरील व्याज असे मिळून रक्कम कंपनीला अदा होण्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक , महावितरण कंपनी यांना लेखी विनंती करूनही काम वेळेत पूर्ण करणा-या कंपनीला देयक अदा करण्याची कार्यवाही झालेली नसल्याने शासन संबंधितांची चौकशी करणार आहे काय, त्यानुसार कंपनीला देयक अदा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) हे खरे नाही कंत्राटदाराने वाढीव साहित्याचे (Missing Items) देयका बाबत मुख्यालय मुंबई येथे तक्रार केल्यामुळे या प्रकरणी कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्य अभियंता, लातूर यांना देण्यात आले. त्यानुसार मुख्य अभियंता लातूर यांनी दि.१९.०८.२०१९ रोजी एक त्रिसदस्यीय समिती स्थापन केली, त्या समितीमध्ये अधीक्षक अभियंता लातूर मंडळ, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, लातूर विभाग व व्यवस्थापक (वि.व.ले.) लातूर मंडळ कार्यालय यांचा समावेश होता. सदर समितीने दि. २९.०५.२०२० रोजी आपला अहवाल मुख्य अभियंता लातूर यांना सादर केलेला आहे. परंतु, सदर अहवालानुसार उपरोक्त प्रकरणी कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे सदर समितीने कोणताही ठोस निर्णय/मत दिलेले नाही असे मुख्य अभियंता लातूर यांनी कळवलेले आहे.

सबब, संबधित प्रकरणाची कागदपत्रे शोधण्यासंबधी मुख्य अभियंता लातूर यांना निदेर्शित करण्यात आलेले आहे. तसेच लातूर परिमंडळ स्तरावर नियुक्त समितीचा निष्कर्ष निर्णायक नसल्यामुळे सदर प्रकरणाची सत्यता पडताळणी करण्यासंबधी व मे. आकाश इलेक्ट्रीकल्स यांच्या तक्रारीचे निरसन करण्याकामी मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) महावितरण यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती स्थापित करण्यात आली असून सदर समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मौजा पानवाडी (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील पानवाडी ते दिघी (रिट) रस्ता व आजनगांव ते दिघी (रिट) शिवारातील दोन नाल्यावर पुलाचे व नालीचे बांधकामास निधी उपलब्ध करणेबाबत

(३३) ४३१५५ (०१-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा पानवाडी (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील पानवाडी ते दिघी (रिट) व आजनगावं ते दिघी (रिट) येथील दोन मोठ्या नाल्याचे पाणी शेत शिवाराकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहणाऱ्या पाण्यामुळे पानवाडी ते दिघी (रिट) व आजनगाव ते दिघी (रिट) या दोन्ही शिवारात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पाण्यामुळे रस्त्यावर होणाऱ्या चिखलातून जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्‌अनुषंगाने सदर पूल व नाल्याचे बांधकाम करण्यास तसेच निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. पानवाडी ते दिघी रस्त्यावर पुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. आजनगाव ते दिघी रस्ता हा सुकळी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामुळे बाधित झालेला आहे. आजनगावातील कास्तकारांनी पानवाडी ते दिघी रस्त्यांनी वाहतुक करणे अपेक्षित आहे.

(३) सदर प्रकरणी मौका पाहणी केलेली आहे. पानवाडी ते दिघी रस्ता व आजनगाव ते दिघी रस्ता सुकळी लघु प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामुळे बाधित होत आहे. पानवाडी ते दिघी रस्त्यावर पुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाच्या मंजुर चतुर्थ सुप्रमापेक्षा जास्त होत असलेल्या खर्चाच्या प्रस्तावास सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात

रु. १०० लक्ष तरतूद असून या अनुदानाच्या मर्यादितच खर्च करण्यास दि.२५.०५.२०२२ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रावेर, मुक्ताईनगर व बोदवड (जि.जळगांव) तालुक्यात अतिभाराने रोहित्र जळत असल्याबाबत

(३४) ४३१७२ (०९-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर, मुक्ताईनगर व बोदवड (जि.जळगांव) तालुक्यातील १७४ गावांपैकी सुमारे १०० गावांमध्ये बागायत क्षेत्र असल्याने महावितरणामार्फत इन्फ्रा १ आणि २ च्या माध्यमातून पर्याप्त वाढीव जोडणी मिळत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच ६३ किंवा १०० केव्हीए क्षमतेच्या रोहित्रांवर २०० केव्हीए क्षमतेचे कनेक्शन असल्याने रोहित्र अतिभार झाल्याने जळत असल्याचा घटना मोठ्या प्रमाणात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याकरिता १०० टक्के अतिभारित रोहित्रांजवळ नविन रोहित्र उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विंलबांची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही. इन्फ्रा १ ही योजना २००९ ते २०१४ मध्ये आणि इन्फ्रा २ ही योजना २०१५ ते २०१७ मध्ये राबविण्यात आली.

(३) रावेर, मुक्ताईनगर व बोदवड (जि. जळगाव) तालुक्यातील सद्यस्थितीत १०० टक्के अतिभारीत रोहित्र नाहीत. प्रणाली सुधारणा करणेसाठी व विज ग्राहकांना सुरळीत व अखंडीत विजपुरवठा मिळणेसाठी विविध योजनांमध्ये रोहित्र प्रस्तावित करण्यात आली आहेत. या अंतर्गत, ज्या ठिकाणी राहित्रे ८०% किंवा त्यापेक्षा जास्त अतिभारीत आहेत त्या ठिकाणी प्राधान्याने नविन रोहित्रे किंवा क्षमतावाढ करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नगरपालिका/नगरपंचायत/ नगरपरिषदा हद्दीतील विदयुत वितरणच्या कामांना निधी देण्याबाबत

(३५) ४३१७५ (०९-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील विदयुत वितरणाच्या कामांसाठी मोठया प्रमाणात निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत देण्यात येत असला तरी नगरपालिका/नगरपंचायत/ नगरपरिषदा हद्दीतील विदयुत वितरणच्या कामांना निधी दिला जात नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवनिर्मित मुक्ताईनगर व बोदवड नगरपंचायतीत अनेक ठिकाणी ५० वर्षे जुने विदयुत वितरण असून मुक्ताईनगर व बोदवड नगरपंचायतीला या अटीतून बाहेर काढल्यास नविन इन्फ्रास्ट्रक्चर करिता निधी उपलब्ध करण्यासंदर्भात शासन निर्णय घेणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत कामांचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीला पाठविले जातात व जिल्हा अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांचेकडून प्रशासकीय मान्यता सादर केलेल्या प्रस्तावांना मान्यता दिली जाते. सदर कामांची मंजूरी जिल्हा नियोजन समितीकडून होत असल्याने नविन पायाभूत सुविधा उभारण्याकरीता निधी उपलब्ध करण्यासाठी महावितरणतर्फे कुठलीही अट टाकली जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील भाडेतत्वावर बाहेर गेलेल्या झोपडीधारकांवर अन्याय होत असल्याबाबत

(३६) ४३२१४ (१८-०४-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील भाडेतत्वावर बाहेर गेलेल्या झोपडीधारकांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टीवासीयांना भाडेतत्वावर पाठवल्यानंतर विकासकाच्या निष्क्रियतेमुळे मुंबईतील अनेक योजना बंद आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बंद योजनांमधील भाडेतत्वावर बाहेर गेलेल्यांचे विकासकाने भाडेबंद केल्याच्या अनेक तक्रारीही आल्या आहेत अशा किती तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत,
(४) असल्यास, विकासकाने भाडे देणे बंद केल्यामुळे अनेक कुटुंबे बेघर झाली आहेत, यामुळे विकासकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(६) असल्यास, सदर झोपडीधारकांना पुन्हा भूखंडावर आपले घर बांधण्याची परवानगी देण्यात येणार आहे काय, नसल्यास, त्याची कारण काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील काही योजनांमध्ये पात्र झोपडीधारकांना मुदतीत भाडे मिळत नाही ही बाब खरी आहे.
(२) हे खरे आहे.
(३) झोपडीधारकांना भाडे मिळत नसल्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण तसेच शासनाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत असतात.
(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे भाडे मिळत नसल्याबाबत प्राप्त तक्रारींवर प्राधिकरण परिपत्रक क्र.१५३, १६६ व १५३(अ) नुसार सुनावणी घेऊन भाडे देण्याबाबत विकासकास आदेशीत केले जाते. आदेशानुसार मुदतीत विकासकाने भाडे न दिल्यास विकासकाचे योजनेतील विक्री घटकाचे बांधकाम थांबविण्यासाठी अभियांत्रिकी विभागास अहवाल सादर करण्याची तरतूद आहे. याउपरही विकासकाने भाडे न दिल्यास विकासका विरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये कारवाई प्रस्तावित केली जाते.
(६) याबाबत अधिनियमात कोणतीही तरतूद नाही.

वणी (जि.यवतमाळ) येथे पोलीस ठाण्याअंतर्गत परिसरात होण्या-या अवैद्य कामाबाबत

(३७) ४३२९० (१२-०४-२०२२). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) येथे पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध दारु विक्री, मटका, जुगार, कोंबड बाजार व अवैध प्रवासी वाहतुक सुरु असूनही पोलीसांचे दुर्लक्ष होत असून पोलीस संरक्षण देत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अवैध व्यवसायामध्ये अनेकजण गुंतल्याने अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात कोंबड बाजार व अवैध व्यवसायावर आळा घालण्याच्या दृष्टीने पोलीसांनी कोणती कारवाई केली तसेच हे अवैध व्यवसाय बंद करुन पाठींबा देणा-यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) यवतमाळ जिल्हयातील पोलीस स्टेशन वणी अंर्तगत अवैध दारु विक्री, मटका, जुगार, कोंबड बाजार व अवैध प्रवासी वाहतुक सुरु नाही. तथापि, लपुन छपुन चालणा-या अवैध धंद्यावर माहिती प्राप्त होताच छापे टाकून कार्यवाही करण्यात येते.पोलीस स्टेशन वणी अंतर्गत सन२०२१ व सन २०२२ मध्ये अवैध धंद्यावर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती खालीप्रमाणे आहे.

वर्ष	प्रकार	केसेस	अटक आरोपी	जप्त माल (रूपये)
सन २०२१	अवैध दारू	१५३	१५४	३,८८,९२,००८
	अवैध मटका / जुगार	७१	१३०	१४,४०,९५०
	कोंबडा बाजार	७	५१	२९,९१,७७०
	अवैध प्रवासी वाहतुक	३००		
सन २०२२ (२० मे पर्यंत)	अवैध दारू	३८	४०	१,१८,६८०
	अवैध मटका / जुगार	५६	६१	६,५९,३४५
	कोंबडा बाजार	१	७	१,३४,९९०
	अवैध प्रवासी वाहतुक	११६		

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जलनिस्सारण विभागाकडून कार्यवाही होणेबाबत

(३८) ४३३५० (२९-०३-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटके (ता.कराड,जि.सातारा) येथील शिवारातील पाण्याचा निचरा होत नसल्याने बहुतांश शेती नापीक होत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकरणी बऱ्याच वर्षांपासून शेतकऱ्यांना नापिकीमुळे आर्थिक नुकसान होत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या जमिनीतील पाण्याचा निचरा करण्यासाठी शासनाच्या जलनिस्सारण विभागाकडून उपाययोजनांची शेतकऱ्यांना गरज असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर शासनाच्या जलनिस्सारण विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) हे खरे आहे.

(२) खरे आहे

(३) खरे आहे.

(४) कृष्णा नदीच्या उपसा सिंचन लाभक्षेत्रातील मौजे आटके च्या ग्रामस्थांनी दि.२१/०१/२०२२ अन्वये निवेदन देवून सर्वेक्षण होवून निधी देण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांनी सदर क्षेत्राची पाहणी केली असता असे निदर्शनास आले आहे की ठिकठिकाणी नैसर्गिक नाल्यांवर अतिक्रमण झाल्यामुळे नाले आकुंचित/नाहिसे झाले आहेत. परिणामी भुभागावरुन पावसाळ्यात येणाऱ्या पाण्याचा निचरा होत नाही व काही ठिकाणच्या शेतजमिनींवर मोठ्या प्रमाणात पाणी साठून राहते. काही शेतकऱ्यांनी यावर पर्यायी व्यवस्था म्हणून शेतजमिनी मातीने भरुन घेतल्यामुळे जमिनीच्या पातळयांमध्ये बदल होऊन प्रवाही पाण्यास अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे मौजे आटके, ता. कराड जि. सातारा येथील क्षारपड निर्मूलना करिता चर योजना करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र सद्य:स्थितीत चर योजनेचे मापदंड निश्चित करण्यासाठी अभ्यासगट गठीत करण्यात आला असून चर योजनेचे आर्थिक व तांत्रिक मापदंड निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तद्‌नंतर प्रस्तुत प्रकरणी अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कराड तालुक्यातील गावांमध्ये नदीवरील शेतीपंपाची सबमर्सिबल कॉपर वायर चोरट्यांनी गहाळ केल्याबाबत

(३९) ४३३५१ (१२-०४-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड तालुक्यातील शेरे भागातील गावांमध्ये नदीवरील पाणी उपसा करणारे पंप त्यांच्या सबमर्सिबल कॉपर वायर चोरट्यांनी चोरले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी चोरट्यांचे रॅकेट निदर्शनास आणण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत असून शेतकरी पोलिसांना तक्रार देण्यास गेल्यानंतर पोलीस कायदेशीर प्रकार सांगून वेळ काढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) शेरे गावात सन २०१७ मध्ये तक्रारदार यांच्या मालकीच्या शेतातील मोटरपंप साठी वापरली जाणारी वायर चोरीला गेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी कराड पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. २६४/२०१७, भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु असून गुन्ह्याबाबतची तूर्त “अ” समरी दिनांक ०७.१२.२०१७ रोजी क्रमांक ७२/२०१७ अन्वये मा.न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

माखजन (ता. संगमेश्वर, जि. रत्नाजगिरी) येथील भाटले परिसरात मुस्लिम वस्ती रस्ता लगत असलेला महावितरणचा लोखंडी खांब बदलण्याबाबत

(४०) ४३३६४ (०९-०४-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माखजन (ता. संगमेश्वर, जि. रत्नाजगिरी) येथील भाटले परिसरात मुस्लिम वस्ती रस्ता लगत असलेला महावितरणचा लोखंडी खांब गंजून धोकादायक बनला असल्याने विदयुत खांब विनाविलंब बदलण्यात यावा म्हणून तेथील ग्रामपंचायतीने मागील ६ महिन्यांहून अधिक कालावधीपासून माखजन तसेच संगमेश्वर येथील महाराष्ट्र महावितरण कंपनीकडे निवेदनाद्वारे तसेच प्रत्यक्ष भेट घेऊन मागणी केलेली असतानाही महावितरणच्यां संबंधित अधिका-यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यारस, भाटले (माखजन) (ता. संगमेश्वणर, जि. रत्नारगिरी) येथील विदयुत खांब विनाविलंब बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१),(२) व (३) हे खरे नाही.

भाटले परिसरात मुस्लिम वस्ती रस्ता लगत असलेला महावितरणचा लोखंडी खांब गंजून धोकादायक बनला असल्याने विद्युत खांब विनाविलंब बदलण्याबाबतचे माखजन, ता.संगमेश्वर येथील ग्रामपंचायतीचे निवेदन शाखा कार्यालय आरवली येथे दि. १२.०१.२०२२ रोजी प्राप्त झाले. तद्नंतर लगेचच सदर पोलची पहाणी करुन सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलच्या खालील बाजूस क्लॅम्प व पोल पीस जोडून सदर पोलची तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्ती करण्यात येऊन

पोलला कोणत्याही प्रकारे धोका निर्माण होणार नाही याची खातरजमा करण्यात आली. तसेच सदर परिस्थितीवर कायम स्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने सदर गंजलेला पोल दि. १९.०२.२०२२ रोजी बदलण्यात आला आहे. तरी ६ महिन्यापेक्षा अधिक कालावधी उलटून गेल्यानंतरही महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची बाब खरी नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरातील 'जहान' इंटरनॅशनल टूरचे मालक व इतर साथीदार यांनी शेकडो मुस्लिम भाविकांची कोट्यवधीची फसवणूक केल्याबाबत

(४१) ४३३७० (१३-०४-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील 'जहान' इंटरनॅशनल टूरचे मालक व त्याच्या इतर साथीदार यात्रेचे आयोजन करतो असे सांगून राज्यभरातील शेकडो मुस्लिम भाविकांची कोट्यवधीची फसवणूक केल्याचा प्रकार गेल्या दोन वर्षांपूर्वी निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त फसवणूकीसंदर्भात कृती समितीच्यामार्फत नाशिक जिल्ह्यातील जवळपास १३०० मुस्लिम भाविकांनी नाशिक शहरातील मुंबई नाका पोलीस ठाण्यात तसेच गुन्हा अन्वेषण शाखा, नाशिक यांचेकडे रितसर तक्रारी केल्यानंतरही दोन वर्षांहून अधिक कालावधी उलटून गेला तरीही संबंधित गुन्हेगारांविरोधात कोणतीही कायदेशीर कारवाई पोलीसांकडून तसेच शासनाकडून झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कोट्यवधीच्या फसवणूकीच्या प्रकरणाचा तपास करण्यास पोलीसांकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ व दिरंगाई होत असल्याचा आरोप फसवणूक झालेल्याकडून करण्यात आला असून कारवाई करण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधित गुन्हेगारांविरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४)
सदर प्रकरणी मुंबई नाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं. २६७/२०१८; ५७/२०१९ व १८१/२०२१ अन्वये गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्ह्यात एकूण ०४ आरोपी असून आरोपी क्र.१ हा गुन्हा दाखल होण्यापूर्वी पासूनच परदेशी वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाले आहे.
आरोपी क्र.२ यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
आरोपी क्र. ३ व ४ हे फरार असून त्यांच्याविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ८२ नुसार कार्यवाही करण्यात येत असून कलम ८३ अन्वये त्याबाबतचा अहवाल मा. न्यायालयात सादर करण्यात आलेला आहे.
(५) विलंब झालेला नाही.

औसा (जि.लातूर) येथे उमेद अंतर्गतच्या महिला बचत गटाची फसवणूक झाल्याबाबत

(४२) ४३३८२ (१२-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) येथे उमेद अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या अनेक गावातील महिला बचत गटाची अगरबत्ती उद्योगाच्या नावाखाली अंतर्नाद इंडस्ट्रीज प्रा.लि., अकोला या कंपनीकडून फसवणूक केल्याबाबत संबंधित महिला बचत गटाने पोलीस ठाणे येथे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फसवणूकीबाबत तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली आहे काय, चौकशीनुसार काय निष्पन्न झाले व तद्नुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) व (२) अंतर्नाद इंडस्ट्रीज प्रा.लि., अकोला या कंपनीने महिला बचत गटाची फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस स्टेशन औसा येथे दिनांक १२.०१.२०२२ रोजी गु.र.नं.१७/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील एकूण ०३ आरोपींपैकी आरोपी क्रमांक १ व २ यांना मा.सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला असून आरोपी क्रमांक ३ हा फरार आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

इंदारपूर (जि.पुणे) येथे अपघातग्रस्त कंटेनरमधून २२ लाखांचा गुटखा जप्त केल्याबाबत

(४३) ४३४०९ (१२-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंदारपूर (जि.पुणे) येथे अपघातग्रस्त कंटेनरमधून २२ लाखांचा गुटखा जप्त केल्याची घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघातानंतर पोलीस स्टेशनच्या आवारात लावलेल्या कंटेनरमधून पाच दिवसांनी हे प्रकरण निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीअंती त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) व (२) होय.
(३) दि.०९/०१/२०२२ रोजी अपघात झालेनंतर अपघातग्रस्त कंटेनर इंदापूर पोलीस स्टेशनचे बाहेरील रस्त्यालगत लावण्यात आला होता. अपघातग्रस्त कंटेनरबाबत कोणीही माहिती देण्यास इंदापूर पोलीस स्टेशनला आले नसल्याने तसेच कंटेनरला सील असल्याने कंटेनरच्या मालकाला संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचा शोध लागला नसल्याने दि.१२/०१/२०२२ रोजी कंटेनरचे सील तोडले.

कंटेनरमध्ये महाराष्ट्र शासन प्रतिबंधित व मानवी आरोग्यास अपायकारक असा रु.२२,२७,५००/- किंमतीचा गुटखा आढळून आला. याबाबत इंदापूर पोलीस स्टेशन येथे गु.रं.नं. २०/२०२२ भादंवि ३२८,१८८, २७९, ३३७, ३३८, ४२७, ३४, मो.वा.का. कलम १८४ तसेच अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ चे कलम २६(२), २७(३), (म), ५९ अन्वये दि.१२/०१/२०२२ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अपघातग्रस्त कंटेनरचा चालक गंभीर जखमी झाला असल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून अंतरिम जामिन मंजुर झाला आहे. अन्य एका आरोपीस अटक करण्यात आली असून सदर गुन्हाच्या तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हडपसर (जि.पुणे) येथे लाखो रुपयांचा गुटखा जप्त केल्याबाबत

(४४) ४३४२२ (१२-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हडपसर (जि.पुणे) येथे लाखो रुपये किंमतीचा बेकायदा गुटखा वाहतूक करणारा ट्रक पोलिसांनी जप्त केल्याची घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुटखा परराज्यातून पुण्यामध्ये विक्रीसाठी आणला जातो, हे ही खरे आहे काय ?

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अवैध गुटका विक्रीबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) होय.
(३) दि.०९/०१/२०२२ रोजी हडपसर पोलीस स्टेशन हद्दीत गुटखा वाहतुक करीत असताना ट्रक मिळून आल्याने गु.र.नं. ३४/२०२२ भादंवि कलम २७२, २७३, ३२८, ४२०, ४७१, ४७२, ४६५, ४६७, ४६८, १८८, ३४ व अन्‍ा सुरक्षा मानके कायदा २००६ चे कलम २६(२)(i), २६(२) (iv), चे उल्लंघन केल्याने कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक नागरिकांसोबत कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने घेण्यात येणा-या मिटींग मध्ये तंबाखु तसेच गुटख्या पासून होणा-या नुकसानाबाबत माहिती देणे, गुटख्यापासून होणा-या नुकसानीबाबत जनजागृती करणे तसेच शाळा व कॉलेज मधील विद्यार्थ्यांना माहिती देणे करीता पोलीस पथकाला अवगत करणे इ. उपाययोजना वेळोवेळी करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात गेल्या सात महिन्यात हॅकर टोळ्यांनी ४८ हजार फेसबुक युजर्सची खाती हॅक केल्याबाबत

(४५) ४३५३३ (१२-०४-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गेल्या सात महिन्यात हॅकर टोळ्यांनी ४८ हजार फेसबुक युजर्सची खाती हॅक करुन त्याचा गैरवापर केल्याचे माहे डिसेंबर मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू खाती हॅक होऊन त्यात पोलीस दलातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा देखील समावेश असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणात संबंधितांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) सन २०२१ मध्ये राज्यात फेसबुक युजर्सची खाती हॅक करून त्याचा गैरवापर केल्याबाबत एकूण १५ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यापैकी १० गुन्हे उघड झाले आहेत. त्यामध्ये एकूण ५ आरोपिंना अटक करण्यात आली आहे.
(२) सन २०२१ मध्ये राज्यामध्ये पोलीस दलातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे फेसबुक खाते हॅक झाल्याबाबत एकूण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यापैकी ०१ गुन्हा उघड झाला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपिला अटक करण्यात आली आहे.
(३) फेसबुक, ट्वीटर, इन्स्टाग्राम, व्हॉटसॲप यासारख्या सोशल मिडीयाचा वापर व त्याबाबत घ्यावयाची दक्षता यासाठी जनजागृती करण्यात येते. तसेच शाळा, महाविद्यालये व इतर संस्था यासारख्या ठिकाणी ऑनलाईन जनजागृती करण्यात येते. संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी जनजागरुकता शिबिरे घेतली जातात. तसेच सोशल मिडियाद्वारे, इंटरनेट माध्यमांद्वारे देखील सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते. फेसबुकसंदर्भात होणाऱ्या गुन्ह्यांबाबत ॲडवायजरी तयार करून समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मागाठाणे विधानसभा क्षेत्रात (बोरिवली, मुंबई) वाढलेल्या अंमली पदार्थ विक्रेत्यांवर आळा घालण्याबाबत

(४६) ४३६१९ (१३-०४-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे विधानसभा क्षेत्रात (बोरिवली, मुंबई) अंमली पदार्थाचे विक्रेते वाढत असल्याने यावर आळा घालण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार पोलिस प्रशासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार अंमली पदार्थ विक्रेत्यांना आळा घालण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच पोलिसांनी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील परिमंडळ -१२ अंतर्गत समतानगर, कस्तुरबा मार्ग, दहिसर या पोलीस ठाण्यांतर्गत सन २०२१ मध्ये अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या इसमांवर ३७ व अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या इसमांवर ३८१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच सन २०२२ (मार्च २०२२ अखेर) मध्ये अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या इसमांवर १४ व अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या इसमांवर २२३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अंमली पदार्थांची विक्री/ सेवन करणाऱ्यांवर वेळीच प्रतिबंध करण्यासाठी सर्व पोलीस ठाण्याचे दहशतवादी विरोधी पथक, निगराणी पथक, गुन्हे प्रकटीकरण स्टाफ, गस्तीवरील वाहने, बिट मार्शलमार्फत गस्त केली जाते. तसेच गुप्त बातमीदार, लोकप्रतिनिधी यांच्याकडून माहिती प्राप्त होताच तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

केज (जि.बीड) यैथील विधानसभा मतदार संघातील विजेच्या कामांना
मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(४७) ४३७३५ (२५-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) तालुक्यातील विधानसभा मतदार संघातील विजेच्या विविध क्रमांक ०१ ते १९ कामांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी संचालक, महावितरण, मुंबई. यांच्याकडे दि.२ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्यामधील किती कामांना मंजुरी दिली तसेच मंजुरी दिलेल्या किती कामासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे,

(३) असल्यास, अद्याप पर्यंत शासनाने उक्त कामांस निधी मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने केज विधानसभा मतदार संघातील मागणी केलेल्या नविन ०९ उपकेंद्रापैकी, ०६ नविन उपकेंद्र ही केंद्र पुरस्कृत सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) प्रस्तावित करण्यात आली असून ०१ उपकेंद्र कृषी आकस्मिक निधी योजनेअंतर्गत प्रस्तावित आहे. सदर निवेदनात मागणी केलेल्या १६ अतिरिक्त/क्षमतावाढ पॉवर ट्रान्सफॉर्मर सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहेत.

तसेच केज मतदार संघातील पाथरा, सारुळ ता. केज व वाघाळा ता. अंबेजोगाई येथे मागणी केलेल्या १३२ के. व्ही. अतिउच्चदाब उपकेंद्राचा प्रस्ताव दि.२४.०६.२०२२ रोजी महापारेषण कंपनीस सादर करण्यात आला आहे. पाथरा व वाघळा येथील जागेत १३२ के.व्ही उपकेंद्र उभारण्याबाबत तांत्रिक सुसाध्यता व आर्थिक व्यवहार्यता तपासून पुढील नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(३) मा. श्रीमती नमिता मुंदडा, विधानसभा सदस्य यांचे मागणीनुसार केज मतदार संघातील नविन उपकेंद्रे, उपकेंद्रामध्ये अतिरिक्त ऊर्जा रोहित्र बसविणे इत्यादी मागण्यांपैकी काही कामे नवीन "सुधारित वितरण क्षेत्र योजना" अंतर्गत प्रस्तावित करण्यात आली असून योजनेस प्राप्त निधीच्या व जागेच्या उपलब्धतेनुसार व मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मंजूरीनंतर सदर कामे प्राधान्याने करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वरोरा (जि.चंद्रपूर) येथे चिमूर रोडवरील आश्रमशाळेच्या बंद इमारतीत होत असलेल्या अवैध कामाबाबत

(४८) ४३७३८ (१३-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथे चिमूर रोडवरील आश्रमशाळेच्या बंद इमारतीत अवैध काम चालत असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील अवैध कामे तातडीने बंद करुन दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) वरोरा (जि. चंद्रपूर) येथील चिमुर रोडवरील असलेली आश्रमशाळेची इमारत जुनी व पडक्या स्थितीत असून सद्या बंद आहे. सदर आश्रमशाळेतील परिसरात अवैध काम चालत असल्याबाबत दि. १८ जानेवारी, २०२२ दरम्यान कोणत्याही प्रकारची तक्रार निवेदन प्राप्त झाले नाहीत.
सदर आश्रमशाळा मृतक महादेव राघोबाजी परचाके यांचे नावाने असून मृतक यांचा मुलगा सुरेश महादेव परचाके यांना आश्रमशाळेची देखभाल करण्याची व सुरक्षा रक्षक ठेवणे बाबत पोलीस स्टेशन वरोरा यांचे वतीने सूचना देण्यात आल्या आहेत. सदर परिसरात लोकांचे अवागमन कमी असल्याने पोलीस स्टेशन, वरोरा येथील अधिकारी, अंमलदार, बिट मार्शल, बिट अंमलदार यांना नियमित पेट्रोलिंग करण्याबाबत आदेशित करण्यात आले असून पेट्रोलिंग सुरु करण्यात आलेली आहे. तसेच आजुबाजुच्या नागरिकांना सुध्दा त्यांना सदरचे ठिकाणी काही अनुचित प्रकार होत असलयाचे आढळून आल्यास तात्काळ पोलीस स्टेशन येथे कळविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विले पार्ले (मुंबई) येथे राहणाऱ्या एका महिलेच्या हत्येबाबत

(४९) ४३७६३ (१३-०४-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विले पार्ले (मुंबई) येथे राहणाऱ्या बेपत्ता असलेल्या श्रीमती कॅरल मिस्किटा यांची दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास हत्या झाल्याचे निदर्शनास आल्याने याप्रकरणी एका व्यक्तीस अटक करण्यात आल्याचे समजते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कॅरलच्या कुटुंबीयांनी दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक पोलिसात सदर व्यक्ती हरवल्याची तक्रार दाखल करुनही पोलिसांनी तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली नसल्याचे कुटुंबियांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) : (१) विलेपार्ले मुंबई येथे राहणाऱ्या बेपत्ता असलेल्या कॅरल मिस्किटा यांची हत्या झाल्याबाबत पालघर पोलीस ठाणे येथे गु.र.क. ३४/२०२२ भा.दं.वि.सं कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल केला असून याप्रकरणी झिको मिस्किटा हया व्यक्तीला पालघर पोलीस ठाणे यांनी अटक केलेली आहे.

(२) व (३) श्रीमती कतरीन किलफर्ट मिस्किटा, यांनी दिनांक २६/०१/२०२२ रोजी सांताक्रुझ पोलीस ठाणे, मुंबई येथे समक्ष हजर राहून त्यांची मुलगी कॅरल मिस्किटा ही हरविल्याबाबत तक्रार केली. सदरच्या तक्रारीची तात्काळ दखल घेवून सांताक्रुझ पोलीस ठाणे, मुंबई यांनी हरविलेल्या मोठ्या व्यक्तींची नोंदवही क्रमांक १२/२०२२ अन्वये दि.२६/०१/२०२२ रोजी नोंद करुन हरविलेल्या महिलेचा शोध घेण्याकरिता तपास चालू केला असता दि. २४/०१/२०२२ रोजी पालघर येथे तिची हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबत पालघर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३४/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल असून ते नमूद गुन्हयाचा तपास करीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे किनीथोट (ता.औसा, जि.लातूर) सह इतर गावातील घरावरून
गेलेल्या विदयुत लाइन स्थलांतरित करण्याबाबत

(५०) ४३७९० (०९-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मौजे किनीथोट (ता.औसा, जि.लातूर) सह इतर गावातील घरावरून गेलेल्या विदयुत लाइन स्थलांतरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता महावितरण विभाग निलंगा यांच्याकडे सन २०२० मध्ये निवेदनाद्वारे तसेच मुख्य अभियंता यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अश्या प्रकारच्या घरावरून गेलेल्या लाइन किती गावात असून सदरील लाइन स्थलांतरित करण्यासाठी किती निधीची आवशकता आहे,
(३) असल्यास, सदर जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक विदयुत लाइन स्थलांतरित करण्याबाबत आवश्यक निधीची तरतूद करुन लाइन स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) निलंगा विभागाअंतर्गत औसा विधानसभा कार्यक्षेत्रात सुमारे ४३ गावांमध्ये विद्युत वाहिनीच्या खाली घरे बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधीत वाहिन्या स्थलांतरीत करण्यासाठी अंदाजे रु.८.४० कोटी निधीची आवश्यकता आहे.
(३) मा. आमदार महोदयांच्या सुचनेनुसार व जिल्हा नियोजन समिती (DPDC) योजनेमधील प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार व स्थानिक ग्रामपंचायत यांनी पर्यायी जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर खरोसा, किनीनवरे, किनीथोट, भंगेवाडी येथील ११ के.व्ही. वाहीनी स्थलांतरणाची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. पर्यायी जागेच्या उपलब्धतेनुसार उर्वरीत विद्युत वाहिन्या स्थलांतरीत करण्याची कार्यवाही जिल्हा नियोजन समिती (DPDC) कडून निधी उपलब्ध झाल्यानंतर अग्रक्रमाने करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
नागपूर. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.